# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०६ फेंब्रुवारी, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)

# श्यामनगर येथील वयोवृध्द इसमाचे खुन प्रकरणाचा छडा लावण्यात पोलीसांना यश

## स्थानिक गुन्हे शाखेकडुन दोन आरोपींताना अटक

दिनांक २९/१०/२०१९ रोजी पोस्टे रामनगर येथे फिर्यादी नामे गौरव पिजुश मंडल वय २३ वर्ष रा. बंगाली कॅम्प,चंद्रपुर. यांनी फिर्याद दिली की, त्यांचे नातेवाईक नामे सपन फकीर हल्दर वय ७० वर्ष रा. श्यामनगर, चंद्रपुर यांना रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने डोक्यावर गंभीर दुखापत करुन व गळा आवळुन ठार केले अशा फिर्याद वरुन पोस्टे रामनगर येथे अपराध क्रं. १३४८/२०१९ कलम ३०२ भादंवि प्रमाणे दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोलीसांनी तपास चक्रे गतीमान करीत सर्व बाजुने तपास करण्यास सुरवात केली. मृतक सपन हल्दर यांना पाच मुले असुन ते सर्व बाहेरगांवी राहतात. मृतक यांची पत्नी एकवर्षापुर्वी आजाराने मरण पावली असुन मृतक हे एकटेच त्यांचे घरात राहत होते. सुरवातीला सदर गुन्हयाचा तपास रामनगर पोलीस करीत होते. गुन्हयाचे गांर्भीय व अज्ञात आरोपीचा शोध लागत नसल्याने सदर प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेने सुध्दा प्रत्येक दृष्टीकोन समोर ठेवुन प्रकरणाचा तपास सुरु केला. तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेतील तपास पथकाने तपास कौशल्य वापरल्याने माहीती मिळाली की, सदर गुन्हयामध्ये आरोपी इसम नामे १) रघुविरसिंग उर्फ मोहीत बसगोपाल ठाकुर वय ३० रा. जुनोना चौक बंगाली वार्ड, चंद्रपुर २) पियुष आनंद तांबे वय १९ वर्ष रा. सिटी शाळेच्या मागे बाबुपेठ, चंद्रपुर यांचा सहभाग असल्याचे व त्या रात्री श्यामनगर भागामध्ये काही लोकांना दिसल्याची गोपनिय माहीती मिळाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या तपास पथकाने वरील दोन्ही आरोपींताना दिनांक ०१/०२/२०२० रोजी रात्री अटक केली. तपासा दरमयान आरोपींतानी चोरी करण्याकरीता गेलो व मृतक म्हातारा झोपेतुन जागा झाल्याने त्यास रॉडने डोकयावर मारले असे निष्पन्न झाले आहे. आरोपी दिनांक ०७/०२/२०२० पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आहेत.

सदर प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थागुशा चंद्रपुर यांचे नेतृत्वात सपोनि जितेंद्र बोबडे, पोलीस उपनिरीक्षक विकास मुंढे, सफौ पंडीत वऱ्हाटे,पोहवा महेंद्र भुजाडे केमेकर, नापोशि अविनाश दशमवार, मनोज रामटेके, संजय आतुकलवार, अनुप डांगे, प्रकाश बल्की पोशि कुंदन बावरी, संजय वाढई, जावेद सिध्दीकी, प्रांजल झिल्पे, नितीन सर्व स्थागुशा, चंद्रपुर यांनी या प्रकरणाचा छडा लावुन आरोपी अटक करण्याकरीता महत्वाची भुमिका बजावली आहे.पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा,चंद्रपुर करीत आहे.

---